मंगळवार, दि. १० मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १८९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेश्वहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध शासकीय योजनांची जालना जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करा - अध्यक्ष शेरसिंग डागोर



**जालना । प्रतिनिधी -** स्वच्छतेमुळे शहराची समृध्दीकडे वाटचाल सुरु झालेली आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या जीवनात अपेक्षित बदल झालेला दिसत नाही. कोरोनासारख्या कठीण काळात जेव्हा सर्वजण घरात होते, तेव्हा पोलीस आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांनीच रस्त्यावर उतरून आपले कर्तव्य बजावले. त्यामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांनी केलेल्या सेवेचा सन्मान राखला गेला पाहिजे. तरी सफाई कर्मचाऱ्यांना देय असलेल्या विविध शासकीय योजनांची जिल्ह्यात त्वरित आणि प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

या बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्री. डागोर यांनी सफाई कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेतला. वारसा हक्क, लाड-पागे समितीच्या शिफारसींची अंमलबजावणी, घरकुल योजना आणि कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षा या विषयांवर त्यांनी सविस्तर चर्चा केली. प्रशासनाने या घटकाकडे संवेदनशीलतेने बघून त्यांच्या अडीअडचणी प्राधान्याने सोडवाव्यात, जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी सफाई कामगारांच्या हितासाठी असलेल्या योजनांचा अहवाल नियमितपणे सादर करावा. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेची' जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. सफाई कामगारांना हक्काचे घर मिळावे यासाठी श्रम साफल्य योजना ही अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेअंतर्गत पात्र सफाई कामगारांना घराचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत. तसेच हा वर्ग आजही हक्काच्या घरापासून वंचित आहे. त्यामुळे प्रशासनाने १९८७ च्या अधिनियमांतर्गत पात्र सफाई कामगारांना त्यांच्या घरांच्या जागांचे मालकी हक्क पट्टे त्वरित वाटप करावेत. तसेच वारसा हक्काच्या प्रकरणांचा निपटारा करणे आणि त्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांना गती देण्याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले. सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाज कल्याण विभागाने त्यांना केवळ स्थानिक शिक्षणच नव्हे, तर परदेशी शिक्षण आणि युपीएससी व एमपीएससीतील राजपत्रित अधिकारी होण्यासाठी प्रशिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. यामुळे या वर्गातील पुढची पिढी सामाजिक आणि आर्थिक विषमतेची साखळी तोडून मुख्य प्रवाहात येऊ शकेल. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यातील सर्व नगर परिषदा व नगर पंचायती तसेच महापालिकेत कार्यरत स्वच्छता कर्मचाऱ्यांना इतर विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रमाणेच सर्व शासकीय सुट्ट्यांचा लाभ मिळणे शासन निर्णयानुसार बंधनकारक आहे. जर त्यांना कामाच्या निकडीमुळे शासकीय सुट्टीत कामावर बोलावले, तर त्यांना त्याऐवजी बदली सुट्टी देण्यात यावी, तसेच कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना आवश्यक सर्व सुरक्षा साधने पुरविणे बंधनकारक आहे. सेवानिवृत्त सफाई कामगारांना त्यांचे सेवा उपदान आणि रजा रोखीकरणाची रक्कम विनाविलंब मिळाली पाहिजे. तसेच सेवेत असताना त्यांचे वैद्यकीय देयके कालमर्यादेत अदा करावीत, असे महत्त्वपूर्ण निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीस नगर परिषद व पंचायतीचे मुख्याधिकारी, संघटनांचे पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनपा-नगरपालिका क्षेत्रातील गायरान जमिनीवरील आरक्षण उठवले

### कोट्यवधींची जमीन सार्वजनिक वापरासाठी मोकळी

**मुंबई -** महाराष्ट्र विधानसभेत जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक मंजूर करण्यात आलं आहे. त्यामुळे आता महापालिका आणि नगरपालिका क्षेत्रातील हजारो हेक्टर गायरान जमीन सार्वजनिक कामांसाठी वापरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलेले महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.

महाराष्ट्र विधानसभेत जमीन वापरासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या विधेयकामुळे महापालिका आणि नगरपालिका हद्दीतील गायरान जमिनींच्या वापराबाबत मोठा बदल होणार आहे. हजारो हेक्टर गायरान जमीन सार्वजनिक जनहिताच्या कामांसाठी वापरण्याचा मार्ग आता मोकळा होणार आहे.

नव्या निर्णयानुसार राज्यातील मनपा आणि नगरपालिका क्षेत्रातील गायरान जमिनीवरील काही आरक्षण उठवण्यात येणार आहे.

यामध्ये महापालिका क्षेत्रातील सुमारे ७७०० हेक्टर जमीन, नगरपालिका क्षेत्रातील सुमारे ४००० हेक्टर जमीन, नगर परिषद क्षेत्रातील सुमारे ३००० हेक्टर जमीन, अशी एकूण हजारो हेक्टर जमीन सार्वजनिक कामांसाठी उपलब्ध होणार आहे.

जमीन शासनाच्या नावावर

या जमिनी शासनाच्या नावावरच राहतील. मात्र शासनाच्या परवानगीने महापालिका किंवा नगरपालिका या जमिनींचा वापर सार्वजनिक हिताच्या कामांसाठी करू शकतील. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, या निर्णयामुळे महापालिका आणि नगरपालिका यांना विकासकामांसाठी मोठा फायदा होणार आहे.

व्यावसायिक वापराला परवानगी नाही

या गायरान जमिनींचा वापर फक्त सार्वजनिक हिताच्या कामांसाठीच करता येणार आहे. व्यावसायिक वापरासाठी या जमिनींचा उपयोग करता येणार नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक

नव्या नियमानुसार गायरान जमीन ही जिल्हाधिकारी जमिनी म्हणून नोंदवली जाईल. या जमिनींचा कोणताही वापर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेणे बंधनकारक असेल. तसेच जमिनीची मोजणी करून तिची नोंद केली जाईल आणि अतिक्रमण हटवून ती शासनाच्या ताब्यात घेतली जाईल. या निर्णयामुळे राज्यातील २९ महापालिका आणि अनेक नगरपालिका क्षेत्रांतील गायरान जमीन विकासकामांसाठी उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

युवा आदर्श

### फुले पुण्यतिथी...

निमित्ते पुण्यस्मरण
कळो क्रांतीज्योती
साधेपणा खरेपणा
गोष्ट तयां आवडती
वाचून चरित्र त्यांचे
मनात लाऊ पणती
आकलन विचारांचे
उजळू लक्ष ज्योती
आचरण विचारांचे
आगळीचं अनुभूती
आचरू दावला पंथ
जागवत तेवूं स्मृती
जाणू क्रांती सूर्यास
वारसा हीच संपत्ती
जोतीबा न् सावित्री
खरे आदर्श दंपती
भेद भावा विरहीत
पुरोगामी सार्थ गति
हात मिळवता हाती
साधेलं तेंव्हा प्रगती
देई आगळी शक्ती
शेतकरी कर्ज मुक्ती
सुदृढ आरोग्यासाठी
कळावी नस दुखती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## गव्हाच्या उभ्या पिकाला आग; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील केहाळ वडगाव येथील शेतकरी शिवाजी चंदू राठोड यांच्या शेतातील उभ्या गव्हाच्या पिकाला शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागून मोठे नुकसान झाले. ही घटना दि. ९ मार्च रोजी दुपारच्या दरम्यान घडली असून गट क्रमांक २१९ मधील त्यांच्या दीड एकर शेतातील गहू जळून खाक आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतातील वीजवाहिनीत झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे आग लागली आणि काही क्षणातच आगीने उभ्या गव्हाच्या पिकाला वेढा घातला. आग लागल्याचे लक्षात येताच शेतकरी व परिसरातील नागरिकांनी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत दीड एकर क्षेत्रातील गव्हाचे उभे पीक जळून खाक झाले. या आगीत शेतकरी शिवाजी राठोड यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाकडून पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तसेच वीज विभागाने शेतातील वीजवाहिन्यांची तपासणी करून अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी करण्यात येत आहे.

## जालना शहर मनपा सभागृहाला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याची मागणी

### शिवसेनेच्यातवीने मनपा आयुक्तांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सभागृहाला हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे. अशी मागणी महानगर पालिकेचे प्रतोद तथा नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले यांनी महापालिकेच्या आयुक्तांकडे केली. आयुक्तांच्या वतीने अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, सहाय्यक उपआयुक्त अपर्णा जाधव यांनी निवेदन स्विकारले.



यावेळी विरोधी पक्षनेते कमलेश खरे, गटनेते दीपक राठोड,दर्शना खोतकर, उषाबाई अशोक पांगरकर,निखिल पगारे,सत्यभामा विजय जाधव,अश्विन अंबेकर, अमोल ठाकूर, पूजा योगेश भगत,संजय डुकरे, पूजा दिनेश भगत, अब्दुल सगीर यांची उपस्थिती होती. निवेदनात पुढे म्हटले आहे की,शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे अखिल भारतीयांसाठी आदर्श असे व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपले आयुष्य राष्ट्र, धर्म व स्वाभिमान यासाठी खर्च केले. आपल्या आयुष्यात त्यांनी सिद्धांताची कधीही तडजोड केली नाही. अशा थोर व्यक्तीचे नाव सभागृहाला दिल्यास त्या सभागृहाचाही सन्मानच होईल. त्यामुळे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव सभागृहाला देण्याची अग्रही मागणी करण्यात आली. यावेळी कुणाल देशमुख, विक्रम काठोटीवाले, अभिमन्यू काठोटीवाले, करण पाटील, धीरज काठोटीवाले आदींची उपस्थिती होती.

## मेन रोडवर भर दुपारी लागलेली आग; पाडेवार यांच्या सतर्कते मुळे आटोक्यात

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथे सोमवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास मेनरोडवरील रस्त्याच्या कडेला असलेल्या वाळलेल्या गवताने अचानक पेट घेतला.त्यामुळे जवळच असलेल्या लाकडी साहित्याच्या दुकानासमोर ठेवलेल्या लाकडी दरवाजाने पेट घेतला. याचवेळी दुकानाला आग लागून संपूर्ण दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. मात्र सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी दाखवलेली सतर्कता व वेळीच केलेल्या मदतीमुळे आटोक्यात आली आणि संपूर्ण दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्यापासून वाचले.

शहरातील मुख्य रस्त्यावर विठ्ठल मंदिराजवळ गणेश गायकवाड यांचे लाकडापासून दरवाजे, खिडक्या तयार करण्याचे दुकान आहे. दरवाजे, खिडक्या यासह फर्निचर तयार करण्याचे काम या ठिकाणी केले जाते. सोमवारी दुपारी तीन वाजता गायकवाड हे दुकान बंद करून जेवण करण्यासाठी घरी गेले होते. त्याच सुमारास सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार हे मोंढा भागातून गाव भागात असलेल्या त्यांच्या घरी



दुचाकीवरून जात होते. याच वेळी पाडेवार यांना दुकानाच्या शेजारी असलेल्या गवताने पेट घेतल्याचे व धूर निघत असल्याचे लक्षात आले.भडकलेल्या आगीने क्षणार्धात संपूर्ण दुकान कवेत घेतले असते मात्र पाडेवार यांनी प्रसंगावधान राखत आजूबाजूच्या नागरिकांना याबाबत कल्पना दिली. नागरिकांनी घरातून पाणी आणत आग विझविण्याचा प्रयत्न केला. समोर असलेल्या अशोक उबाळे यांच्या दुकानाचे बांधकाम सुरु आहे. त्या ठिकाणाहून त्यांनी पाण्याचा पाईप आणून आग विझवली.माजी नगरसेवक गणेश पवार, ज्ञानेश्वर मोरे, अण्णासाहेब खंडागळे पान ४ वर

## बनावट कागदपत्रांच्या आधारे पांजरापोळ संस्थेची जमीन हडपण्याचा प्रयत्न

### सखोल चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील श्री गौरक्षण पांजरापोळ या नोंदणीकृत धर्मादाय संस्थेची जमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे हडपण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

याबाबत दिपक बोर्डे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. जालना शहर महानगरपालिका हद्दीत कार्यरत असलेली श्री गौरक्षण पांजरापोळ ही संस्था नोंदणीकृत असून संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणावर गोसंवर्धनाचे कार्य केले जाते.

संस्थेच्या मालकीच्या काही जमिनींवर डोळा ठेवून बनावट कागदपत्रे तयार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यात खोटे लेटरहेड, खोटी इसारपावती, तसेच बनावट ताबा पावती यांसारखी कागदपत्रे तयार करून संस्थेची जमीन बळकावण्याचा प्रयत्न केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन संबंधितांविरुद्ध चंदनझिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाल्याची माहितीही निवेदनात देण्यात आली आहे. अर्जदाराने असा आरोप केला आहे की, संबंधित व्यक्तींनी यापूर्वीही पान ४ वर

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. शांताराम रायपुरे तर सचिवपदी सुधाकर रत्नपारखे



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. शांताराम रायपुरे तर सचिवपदी सामाजिक कार्यकर्ते सुधाकर रतनराव रत्नपारखे यांची निवड करण्यात आली आहे.

जालना शहरातील सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात रविवारी ( दि. ८) आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. ज्येष्ठ सामाजिक नेते सुधाकर रत्नपारखे हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत गतवर्षीचा तपशील मावळते सचिव प्रा. डॉ. विजय कुमठेकर यांनी सादर केला. यानंतर ४९ व्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या अध्यक्षपदी प्रा डॉ. शांताराम रायपुरे तर सचिवपदी सामाजिक कार्यकर्ते सुधाकर रतनराव रत्नपारखे यांची निवड करण्यात आली. सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या या व्याख्यानमालेसाठी नामवंत व्यक्तींना वक्ते म्हणून निमंत्रित केले जाणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी व्याख्यानमालेच्या वतीने विशेष प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती नूतन अध्यक्ष व सचिवांनी दिली.

या बैठकीस ज्येष्ठ सामाजिक नेते ॲड. बी. एम. साळवे, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, ॲड. शिवाजीआदमाने,राम गायकवाड, सुदामराव सदाशिवे,अशोक साबळे, साईनाथ चिन्नदोरे, जी. आर. चिकटे,डॉ. कालीदास सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, राजेश राऊत, संजय भालेराव, डॉ. प्रियदर्शन भवरे, सतीश वाहुळे, संजय हेरकर,अशोक लबडे, अशोक रगडे,अंकुशराव चव्हाण, राजेंद्र जाधव, प्रकाश मगर, डॉ. एस. आर. पडघन,विलास रत्नपारखे, किशोर कांबळे, सिध्दार्थ मोरे, जगन्नाथ हनवते,पंजाब खिल्लारे, शेषराव सोनवणे, सुनील साळवे, ॲड. सुभाष कांबळे, राजकुमार दांडगे, भास्कर घेवंदे आदींची उपस्थिती होती.

# नागरिकांना उष्मालाटेपासून बचावासाठी दक्षता घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** उष्माघात ही उन्हाळ्यातील एक सामान्य समस्या आहे. ही समस्या तीव्र सूर्यप्रकाश किंवा उष्णतेच्या दीर्घकाळापर्यंत संपर्कात राहिल्यामुळे होऊ शकते उन्हाळी हंगामातील उष्मालाटेमुळे उदभवणाऱ्या उष्माघातांनी मानव, पशु-प्राणी व शेती पिकांवर होणारे दुष्परिणाम टाळण्याच्या दृष्टीने उन्हाळ्यामध्ये नागरिकांनी उष्मालाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दीपक काजळकर यांनी केले आहे.

उष्मालाटेपासून बचावासाठी पुरेसे पाणी प्यावे, तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्यावे. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा. दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करावा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टीव्ही किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू-पाणी, ताक इत्यादीचा वापर नियमित करावा. अशक्तपणा, डोकेदुखी सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पाणी पिण्यास देण्यात यावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे याचा वापर करण्यात यावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे. पहाटेच्या वेळी जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. तसेच बाहेर कामकाज करीत असल्यास मध्ये-मध्ये विश्रांती घेऊन नियमित आराम करावा. गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी.

उन्हात अतिकष्टाची कामे करू नका. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नका. दुपारी १२ ते ३ च्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावी. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे, तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवावीत. अशा सुचनाही जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत.

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग पुरस्काराने अभिनेत्री अक्षता कांबळी सन्मानित

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**कणकवली । प्रतिनिधी -** मालवणी सम्राज्ञी म्हणून ज्यांची सर्वत्र ओळख आहे, ज्यांनी पुरुषप्रधान संस्कृती मोडीत काढीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिला महिला दशावतार सुरू करून गेली पंधरा वर्षे कला क्षेत्रा बरोबर समाजसेवा करत महिलाना व्यासपीठ उपलब्ध करुन दिले.त्यांच्या या कार्याची दखल *महाराष्ट्र राज्य महिला आयोग च्या अध्यक्षा रुपाली ताई चाकणकर व कोकण विभाग अध्यक्षा सुनीता गणगे, मुंबई पुणे विभाग प्रमुख लक्ष्मण मानकर यांनी घेतली. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ७ मार्च २०२६ रोजी पुं ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (रविंद्र नाट्य गृह) प्रभादेवी मुंबई येथे पुरस्कार प्रधान करण्यात आला. संपूर्ण महाराष्ट्र मधून विविध क्षेत्रातील महिला पुरस्कार साठी आल्या होत्या त्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातून अक्षता कांबळी पहिल्या मानकरी ठरल्या.रोख रक्कम, सन्मान चिन्ह सन्मान पत्र, मानाची शाल, सावित्रीबाई च पुस्तक, आणि भेट वस्तु असा ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे. अक्षता कांबळी यांना शासनाचा जिल्हास्तरीय अहिल्याबाई होळकर पुरस्कार ही जाहीर झाला आहे .या दोन्ही पुरस्कारांसाठी सर्व स्तरातून त्याचं कौतुक होत आहे. या पुरस्कारांसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्या महिला व बाल विकास अधिकारी व कर्मचारी यांचे अक्षता कांबळी यांनी मन :पूर्वक आभार मानले.



# ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे आसई येथे मासिक चर्चासत्र उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांची शेतकऱ्यांसाठी स्वयंप्रेरनेने चालविलेली संपुर्ण शेती चळवळ हे ब्रीद घेऊन चाललेल्या ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेस आयोजिण्यात येणारे मार्च महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र सोमवारी जाफराबाद तालुक्यातील युद्धभूमी आसई येथे अत्यंत उत्साहात पार पडले.



ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाला तालुका कृषी अधिकारी श्री. अमोल शिंदे, बदनापूरच्या कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्रज्ञ डॉ. सचिन सोमवंशी, विषय विशेषज्ञ किटकशास्र डॉ. सचिन धांडगे, महाबीजचे विभागीय व्यवस्थापक श्री. राजाभाऊ मोराळे, जिल्हा व्यवस्थापक श्री. एस. एम. तेलंगे पाटील, दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, श्री. पवन देशमुख, अकोला देवचे श्री. सुधीर जोशी, आंबेगावचे श्री. दत्तात्रय देठे हे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी केळी, कोथिंबीर, हरभरा व युद्धभूमी प्रक्षेत्रावर झालेल्या शिवारफेरीत सेवानिवृत्त पोलीस निरिक्षक श्री. दिलीप इंगळे, श्री. आण्णा इंगळे, श्री. तुळशीदास इंगळे, श्री. पंडित इंगळे, श्री. भीमराव इंगळे, श्री. ज्ञानेश्वर इंगळे, श्री. भगवान कोरडे, श्री. गणेश इंगळे, श्री. सुनिल इंगळे, श्री. आंबादास इंगळे, श्री. गजानन इंगळे, श्री. गणेश इंगळे, श्री. लक्ष्मण इंगळे, श्री. देविसिंग इंगळे आदी उपस्थित होते.

# प्रामाणिकपणाचे उदाहरण : ऑटोचालक इरफान अंकल यांनी सापडलेले पाकीट मालकाला केले परत

## रमजान महिन्यात प्रामाणिकपणाची केली जपणूक; चंदनझीरा पोलिसांकडून इरफान अंकलचे कौतुक

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी वाटणाऱ्या जगातही प्रामाणिकपणा जिवंत असल्याचे उदाहरण जालना शहरात पाहायला मिळाले. तलाव सावंगी येथील विकी शिवाजी मेंढरे या युवकाचे पाकीट जालना शहरातील बारवाले कॉलेज परिसरात रस्त्यावर पडले होते. हे पाकीट चंदनझीरा परिसरातील ऑटोचालक इरफान अंकल यांना सापडले.

पाकीट सापडल्यानंतर ते स्वतःजवळ न ठेवता मूळ मालकापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार इरफान अंकल यांनी केला. त्यांनी चंदनझीरा येथील शेख फारूक आणि पत्रकार शब्बीर पठाण यांना याबाबत माहिती दिली. पाकिटात काही रोख रक्कम, दोन एटीएम कार्ड, आधार कार्ड, पनकार्ड आणि एक छोटी डायरी होती. त्या डायरीमध्ये असलेल्या मोबाईल क्रमांकावरून पाच ते सहा जणांना फोन करून संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र कोणीही फोन उचलला नाही.

यानंतर आधार कार्डवरील पत्ता तपासून पाहिला असता तलाव सावंगी असा पत्ता आढळला. त्यानुसार पत्रकार शब्बीर पठाण यांनी सावंगी तलाव येथील पत्रकार तुकाराम राठोड यांच्याशी संपर्क साधला आणि हकीकत सांगीतली. त्यांनी गावातील किशोर झोरे यांना माहिती दिली. किशोर झोरे यांनी विकी शिवाजी मेंढरे यांना त्यांच्या हरवलेल्या पाकिटाबाबत कळवले.



यानंतर विकी मेंढरे यांना चंदनझीरा पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले. सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास चंदनझीरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मारियो स्कॉट दादा, हेडकॉन्स्टेबल कृष्णा तंगे आणि अभिजीत सर यांच्या हस्ते सदरील पाकीट विकी मेंढरे यांना सुपूर्द करण्यात आले. पाकीट मध्ये असलेली पाच ते सहा हजार रू. रोख रक्कम आणि ईतर कागदपत्रे जशासतसे असल्याचे मेंढरे यानी सांगीतले.

यावेळी चंदनझीरा पोलिसांच्या वतीने ऑटोचालक इरफान अंकल यांचे विशेष कौतुक करण्यात आले. इरफान अंकल हे ऑटो चालवून आपला उदरनिर्वाह करतात तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करण्याचे कामही करतात. सध्या मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरू असून रोजा आणि नमाजाची ईबादत सुरू असून कोणताही लोभ न ठेवता त्यांनी तात्काळ पाकीट परत करण्यासाठी प्रयत्न केले.

त्यांच्या या प्रामाणिक वर्तनामुळे चंदनझीरा पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे. इरफान भाई यांच्या या कृतीमुळे आजही समाजात प्रामाणिकपणा आणि माणुसकी जिवंत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## पान १ वरुन

### बनावट कागदपत्रांच्या ...

गोरगरीब नागरिक व व्यापाऱ्यांना त्रास देत अनेक बेकायदेशीर व्यवहार केले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापर्यंत किती जमिनी बेकायदेशीरपणे हडपल्या आहेत, याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच व पीडितांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी` जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या निवेदनाची प्रत जालनाचे पोलीस अधीक्षक तसेच चंदनझिरा पोलीस ठाणे येथील पोलीस निंरीक्षक यांनाही देण्यात आली आहे. या प्रकरणी प्रशासन कोणती कारवाई करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### मेन रोडवर ...

परमेश्वर खाटीकमारे,बाबा उबाळे, गणेश गायकवाड, नितीन उबाळे,यांच्या सह बांधकाम मजुर यांनीही आग विझविण्यास मदत केली.पाडेवार यांच्या सतर्कने आगीची मोठी दुर्घटना टळली.

# जालन्यात अमर साबळे यांच्या वक्तव्याविरोधात निषेध

## वंचित बहुजन आघाडीने होळी करून प्रतिमेचे केले दहन



**जालना । प्रतिनिधी -** भाजपचे नेते अमर साबळे यांनी केलेल्या कथित बेताल वक्तव्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मंठा बायपास रोड अंबड चौफुली जालना येथे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी अमर साबळे यांचे फोटो जाळून निषेध व्यक्त केला.

२ मार्च रोजी मुंबई येथे बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली ''मुद्रा मोदी से मुजरा मोदी'' या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा द्यावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली होती. तसेच नरेंद्र मोदी यांचा जेफ्री एपस्टीनशी काय संबंध आहे, अमेरिकेसोबत देशविरोधी करार का केले जात आहेत, फ्रान्ससोबत राफेल करार का करण्यात आला, तसेच भारताची विदेश नीती अमेरिकेच्या दबावाखाली ठरवली जात आहे का, असे प्रश्न बाळासाहेब आंबेडकर यांनी उपस्थित केले होते.

या प्रश्नांची उत्तरे अद्याप नरेंद्र मोदी यांनी दिलेली नाहीत. दरम्यान, मोदींना प्रश्न विचारल्यामुळे भाजपचे अमर साबळे यांनी बेताल वक्तव्य केल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. त्या वक्तव्याच्या निषेधार्थ जालना येथे आंदोलन करून साबळे यांच्या प्रतिमेची होळी करून दहन करण्यात आले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके जिल्हा उपाध्यक्ष अकबर इनामदार , जिल्हा संघटक राजेंद्र खरात, महीला जिल्हाध्यक्षा रमाताई होर्शिळ, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष सुरज सोनोवने , तालुकाध्यक्ष भानुदास साळवे विलास नरवडे , दिलीप मगर संजय आदमाने सुशीलाताई गायकवाड उप अध्यक्ष महिला आघाडी, लिलाताई काकडे, गणेश खरात, शत्रुघ्न कोळी,शरद वाघमारे,अमोल लोखंडे, सत्यपाल गायकवाड, बुध्दाजी भोसले कपिली सूर्यनारायण, शत्रूधन कोळी, दत्ता आदमाने, पांडुरंग मगर, सोनाली चव्हान, बिरजू भोसले, आलानबाई भोसले, सुनील चव्हाण, अर्केस्ट्रा बाई चव्हान, लक्ष्मी चव्हान, धनराज गिरी,हनुमंत मोरे ,परमेश्वर खरात, संजय सरोदे, माणिक पाढमुख, रविदास पाडमुख, पंडित पाडमुख, शरद वाघमारे प्रकाश म्हस्के यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.